# प्रभुतरुण

वर्ष ४७ | अंक ९ | मुंबई | मार्च २०१४ | पाने ६ | किंमत रु. १

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

www.prabhutarun.org

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## शुभम् भवतु!

**—सुहासिनी कीर्तिकर**

तसे सुहाने अनेक मौसम असतात. पावसाचा, थंडीचा मौसम हवाहवासा. हल्ली मुंबईत तरी या मौसमाने आपले अंदाज चुकवत स्वत:ची न्यारी 'दुनियादारी' दाखवली. पाऊस तर अजूनही गारपीटीसह आपल्याशी अवघ्या महाराष्ट्रात शिवाशिवीचा खेळ खेळतोय्. थंडीलाही बंडी घालून माणसाला अजूनही भेटावेसे वाटते आहे. पण हे झाले निसर्गपालटाचे मौसम. माणसाने आपले आपले अनेक मौसम तयार केले आहेत. सहलीचा मौसम, निवडणुकांचा मौसम. सध्या तरी याची चलती आहे. याच जोडीने बरा-वाईट असा 'बोकांडी' बसलेला मौसम आहे- परीक्षांचा मौसम! बरा... याकरिता की आपण सुशिक्षणासाठी एक विहीत व्यवस्था तयार केली आहे. त्या व्यवस्थेमुळे सुशिक्षण मिळते, स्वत:चे आणि समाजाचे कल्याण करता येते. सुसंस्कृत आचरणाचे धडे मिळतात. ते आपण गिरवतो की नाही; ते अलाहिदा! वाईट का? -तर परीक्षा देणे- घेणे, अभ्यासक्रम ठरविणे, तो करवून घेण्यासाठी शिक्षणसंस्थांची मदत असणे, शिक्षण संचालनालय- विद्यापीठ पातळीवरून विद्यार्थ्यांची गुणवत्ता ठरवणे हे आज अगदी कराल यंत्रणेसारखे झाले आहे. या यंत्रणेत काम करणारे अधिकारी, शिक्षक, कामगार, संचालक यांना आर्थिक विवंचना आहेत किंवा त्या निर्माण केल्या गेल्या आहेत. शासनातर्फे या यंत्रणा पोसल्या जातात, नियंत्रित केल्या जातात. या शासनदरबारी वेतनवाढीसाठी प्रलंबित मागण्या असणे, शासकीय निर्णयाला आव्हान समजून शिक्षणपात्रतेच्या त्यातून पळवाटा शोधणे हे नेहमीचे चित्र झाले आहे. मग 'शिक्षकधर्म हा उदात्त असतो...' वगैरे आदर्श पायदळी तुडवले जातात. अशावेळी 'परीक्षांचा मौसम' म्हणजे शासनाचे नाक दाबण्यासाठी 'सुकाळू'च! म्हणून मग परीक्षांचा मौसम विद्यार्थ्यांसाठी वाईट!

आज काय चित्र आहे? बारावीच्या परीक्षा सुरू झाल्यावर झाला रिक्षावाल्यांचा संप. 'झळ लागू देणार नाही' म्हणणाऱ्यांनी काय उपकार केले का? रस्त्यावरचा कचराढीग उचलला नाही की महानगरपालिकेचा संप सरकारला सुदूर परिणाम टाळण्यासाठी मागण्या मान्य करून संपवावाच लागतो. तीच शक्कल शिक्षक-अध्यापकही वापरत आहेत. कर्मचाऱ्यांचा परीक्षांवर बहिष्कार! कसे घेणार विज्ञानप्रयोग? प्राध्यापकांचा उत्तरपत्रिका तपासण्यावर बहिष्कार! याला त्यांच्या भल्याबुऱ्या मागण्या मान्य करण्याशिवाय सरकारकडे आहे काही उत्तर? सरकारला ही उत्तरपत्रिका सोडवता सोडवता नाकेनऊ येतात. आजघडीला बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणारा वाली शोधत तशाच ढिगाने पडून आहेत. रस्त्यावरचा कचरा उचलला नाही की इतरांना दुर्गंधीला सामोरे जावे लागते. अनारोग्याची समस्या सुरू होते. विद्यार्थ्यांची वर्षभराची मेहनत त्या पेपरांमध्ये अडकून पडली आहे. राष्ट्राचे 'उद्याचे आधारस्तंभ' स्तंभित झाले आहेत. पण त्याचा समाजाच्या अनारोग्याशी असणारा संबंध लगेचच जाणवत नाही ना! तो जाणवत नाही म्हणूनच परीक्षांचे वेळापत्रकही आट्यापाट्या खेळत राहते. 'सीएस' (कंपनी सेक्रेटरी)ची परीक्षा आणि 'एम. कॉम.' (पदव्युत्तर वाणिज्य)ची परीक्षा एकाच दिवशी. आपले भवितव्य घडविण्यासाठी एकाच वर्षी दोन्ही परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे मग काय? 'अनंत

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## नाण्याची दुसरी बाजू

**-संजना कोठारे**

आज ८ मार्च! जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. महिलांच्या कर्तृत्वाची आणि योगदानाची दखल पुरुषांनी घेतल्याचा हा नमुना. एक यशस्वी व्यक्तिमत्व, जिचं योगदान आज कोणत्याही क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने एका पातळीवर आहे अशा स्त्रीच्या अस्तित्वाचा आज सन्मान केला जातो. अतिशय अभिमानाची गोष्ट आहे की, असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करू शकत नाही. एक आजी, आई, मुलगी, बहीण, प्रेमिका, बायको किंवा मैत्रीण अशा विविध भूमिका ती साकारत आली आहे. या सर्व भूमिकांना न्याय देणे तिच्याकडून अपेक्षित असते कारण ती 'स्त्री' म्हणून जन्माला आली आहे. हा तिचा दोष किंवा तिचे भोग. परंतु या सर्व भूमिकांना योग्य न्याय देण्याची जबाबदारी केवळ स्त्रीकडूनच अपेक्षित केली जाते. याचे कारण केवळ स्त्रीलाच या सर्व जबाबदाऱ्या हाताळण्याची क्षमता देवाने दिलेली आहे.

सहनशीलता, प्रेम, धैर्य, कर्तृत्व, या सर्व गुणांनी परिपूर्ण अशी स्त्री एक पूज्य व्यक्तिमत्व आहे. अमेरिकेत २८ फेब्रुवारी १९०९ला पहिला राज्य महिला दिन साजरा केला गेला. परंतु महिला दिन साजरा करण्याचा त्यांचा उद्देश होता महिलांच्या अधिकारांच्या आंदोलनाचा गौरव करणे. तेव्हापासून आजपर्यंत भरपूर बदल घडला आणि आज महिलांना तो दर्जा प्राप्त झालाय् आणि महिला त्यांचे अधिकार प्रत्येक क्षेत्रात सिद्ध करीत आहेत. मग ते पुरुषांच्या बरोबरीचे पद असो किंवा महिलांसाठी खास बस आणि ट्रेनमधील आरक्षित जागा. स्त्री आता सक्षम आहे आणि आपला अधिकार मिळवू शकते.

स्त्रियांनी सगळ्या अडथळ्यांना सामोरं जाऊन या पुरुषप्रधान जगात आपला ठसा उमटवला आहे ही अतिशय अभिमानाची गोष्ट आहे. हे महत्कृत्य केल्याबद्दल काही स्त्रियांना त्यांच्या कामगिरीचा प्रचंड अभिमान असल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या स्वभावात आणि वागणुकीत दिसून येतो. या कामगिरींचा अभिमान न बाळगता नम्र असण्यात मोठेपणा आहे याची जाणीव नसते. स्त्री एक सर्वगुणसंपन्न मनुष्य आहे आणि तीच या सर्व भूमिका योग्यरित्या पार पाडू शकते. मग ती भूमिका आजीची असो किंवा आईची. बहिणीची असो किंवा मुलीची. प्रेमिकेची असो किंवा मैत्रिणीची, परंतु या सर्व भूमिका पार पाडताना तिने नम्रता बाळगायला हवी असे माझे वैयक्तिक मत आहे.

प्रत्येक स्त्री आपल्या कामात उच्च हुद्दा सांभाळून आपल्या घराची, मुलांची आणि नवऱ्याची काळजी घेत असते. परंतु या सर्व भूमिका पार पाडताना आपण किती महान आहोत किंवा आपण आपल्या कुटुंबासाठी किती मोठे योगदान आणि बलीदान दिले आहे याची सतत जाणीव आणि गर्व न करता आपले कर्तव्य समजून करण्यात मोठेपणा आहे असे मला वाटते. आपण किती कर्तृत्ववान आहोत, याची जाणीव क्षणाक्षणाला आपल्या कुटुंबाला किंवा मित्रमैत्रिणींना दाखवण्यात त्या व्यक्तीच्यी प्रती आदर नाहीसा होतो. आपल्या क्षमतेचा आणि कामगिरीचा गर्व नसून नम्रता हाच स्त्रीचा खरा दागिना आहे याची जाणीव प्रत्येक स्त्रीला हवी.

महिलांच्या सुरक्षेसाठी आणि आपला अधिकार मिळविण्यासाठी आपल्या सरकारने कायदेशीर दखलही घेतली आहे. हुंड्यासाठी मानसिक आणि शारीरिक छळ

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

अमुची ध्येयासक्ती' म्हणणाऱ्या या विद्यार्थ्यांनाच अशा आखणीमुळे 'किनारा तुला पामराला' म्हटले जाते! मग अशा 'पामरांना' पैसे घेऊन ('आम आदमी' कुठे आहे?!!) शिक्षकच संचालकांच्या बंगल्यावर पेपर सोडवून देतात. शिक्षणव्यवस्थेचं चांगभलं!

'कोचिंग क्लास'मध्ये आगाऊ पेपर दिले जातात. 'क्लास वन'च योजना ही! पालक म्हणजे शाळा-कॉलेज, कोचिंग क्लास यांची जबरदस्त 'फी' भागवणारे यंत्रच. यंत्रयुगाचा विजय असो! पण तरीही एक मात्र खरे की या पलिकडेही काही चांगले आहे. ते असतेच. काही शिक्षक खरोखरीच चांगले संस्कार करतात. पालक त्याला खतपाणी घालतात. शिक्षणव्यवस्थेला सुसंकृत समाजात आजतरी दुसरा पर्याय (म्हणजे चांगला पर्याय;) नाही. तुमची बुद्धी, तुमचे विचार, तुमचे आचरण आणि तुमचे भविष्य जर घडवायचे असेल तर या परीक्षेच्या मौसमाला सामोरे जावे लागतेच. अशावेळी अभ्यास आणि ज्ञान यांचा मेळ घालणारा विद्यार्थी याही परिस्थितीत वृत्तीने शांत असतो. परीक्षेत काय लिहायला हवे याचे भान राखतो. वेळेचे गणित अचूक सोडवतो. कारण या प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाण्याचे बळ त्याला शिक्षणानेच दिलेले असते. शिक्षणाने या विद्यार्थ्याला घडविलेले असते.

सध्या चालू असणाऱ्या परीक्षेच्या मोसमातील विद्यार्थ्यांने हे भान राखलेच पाहिजे. जीवशास्त्राचा नियम आहे पहा; 'की तोडीता तरू फुटे आणखी भराने.' विद्यार्थीमित्रहो, परीक्षेचा कस लागून तुमचा जीवनवृक्ष बहरतच जाणार आहे; याची खात्री बाळगा. मोगऱ्यामधील एक विशिष्ट जात असते. वसंतऋतुची चाहूल लागली की या मोगऱ्याचे पाणी तोडले जाते. माळी या मोगऱ्याची सगळी पाने कौशल्याने खुडून टाकतो. मग काय होते? नंतर मिळालेल्या पाण्याने मोगरा तरारून उठतो. निष्पर्ण फांद्या मोगऱ्याच्या फुलांनी गच्च लगडून येतात. नेहमीपेक्षा दुप्पट फुले देतात. सध्या परीक्षेच्या मोसमात संप, बहिष्कार जे होताहेत; ते जणू काही पाणी तोडण्यासारखे वा सगळीच्या सगळी पाने खुडून टाकण्यासारखे आहेत. त्यामुळे अंती तुमचे भवितव्य बहरूनच येईल. खात्री बाळगा. आत्मविश्वास वाढवा. 'मोगरा फुलला, मोगरा फुलला'चा भविष्यवेधी अनुभव नक्कीच तुम्हाला येईल.

तेव्हा विद्यार्थीमित्रहो, परीक्षांसाठी-उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी तुम्हाला मनःपूर्वक शुभेच्छा. 'प्रभुतरुणा'कडून. वैयक्तिक माझ्याकडूनही. मी शिक्षकधर्म पाळणारी आहे म्हणून स्वतंत्रपणे माझ्याकडून तुम्हाला अनेकानेक शुभेच्छा. 'नाविका, मी सदैव फिरतो सात नभाखाली' असे तुमचे भविष्यकालीन कर्तृत्व असू द्या.

('अनंत अमुची ध्येयासक्ती' किंवा 'नाविका, मी सदैव फिरतो'... या ओळी का आठवल्या? सत्तावीस फेब्रुवारी हा कुसुमाग्रजांचा वाढदिवस. 'मराठी भाषा दिन'. म्हणून कुसुमाग्रजांच्या ओळींनीच शुभेच्छांना साथ दिलीय.)

'शुभम् भवतु!'

*

फॉर्म ४ (नियम ८)नुसार **'प्रभुतरुण'** मासिकाच्या मालकी व अन्य संबंधातील तपशील फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवसानंतर प्रसिद्ध होणाऱ्या अंकात समाविष्ट करावयाचा मजकूर

| | | |
|---|---|---|
| १) | अंकाचे नाव | : प्रभुतरुण |
| २) | मालकी | : बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण |
| ३) | प्रकाशन काळ | : मासिक |
| ४) | प्रकाशकाचे नाव | : प्रा. सुहासिनी कीर्तिकर |
| ५) | प्रकाशन स्थळ | : पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ |
| ६) | मुद्रकाचे नाव | : प्रा. सुहासिनी कीर्तिकर |
| ७) | मुद्रण स्थळ | : मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ |
| ७) | संपादकाचे नाव | : प्रा. सुहासिनी कीर्तिकर |
| ८) | नागरिकत्व | : भारतीय |
| ९) | संपादकांचा पत्ता | : २१, नवी वाडी, दादीशेठ अग्यारी लेन, मुंबई-४००००२ |

मी, सुहासिनी कीर्तिकर याद्वारे असे जाहीर करते की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

स्वाक्षरी/-
**सुहासिनी कीर्तिकर,**
प्रकाशक

दिनांक : १६ मार्च,२०१४

(पान १ कॉलम ४ वरून)

करणाऱ्यांविरुद्ध कलम ४९८अ आणि हिंसाचाराविरुद्ध न्याय मिळविण्यासाठी 'डोमेस्टिक व्हायलन्स ॲक्ट' असे नियम सरकारने बनविले आहेत. स्त्रिया या कायद्याचा फायदा त्यांच्या अधिकारासाठी करून घेत आहेतच, परंतु निराशाजनक बाब म्हणजे याच कायद्याचा दुरुपयोगसुद्धा याच महिलांच्या हातून होत आहे.. नवरा आणि सासरच्या माणसांविरुद्ध ४९८अ कलमाखाली तक्रार करणे आणि आपल्यावर हिंसाचार सिद्ध करणे सोपे झाले आहे. मानसिक आणि शारीरिक छळाविरुद्ध स्त्रियांना संरक्षण आहे. परंतु पुरुषांसाठी असा कायदा अद्याप योजिलेला नाही. महिला आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करताना आपण पाहतो, परंतु आता त्यांना कायदेशीर संरक्षण मिळाल्यानंतर अशा महिलांची संख्या वाढत चाललेली आहे; जे अशा कायद्याचा दुरुपयोग करू इच्छितात. पुरुषाविरुद्ध कायद्याचा दुरुपयोग करण्याचे प्रमाण इतके वाढत चालले आहे की स्त्रीबद्दल जी कमकुवत आणि लाचार अशी भावना होती ती आता बदलत चाललेली आहे. तो दिवस दूर नसेल जेव्हा पुरुषांना त्यांच्या संरक्षणासाठी हीच लढाई लढावी लागेल.

ही झाली नाण्याची एक बाजू. परंतु एवढे कायदे असूनही स्त्री सुरक्षित नाहीच हे आपण रोज वृत्तपत्रात पाहतोच. लैंगिक छळवणूक, बलात्कारासारख्या भयंकर गुन्ह्यापासून अजूनही स्त्रियांना संरक्षण नाहीच. स्त्रिया कितीही पुरुषांच्या बरोबरीने समाजात वावरल्या तरी लैंगिक छळवणुकीतून त्यांची सुटका नाही. मग कसला 'महिला दिन' साजरा केला जातो? केवळ आपल्या आईबहिणी आणि बायको पुरता महिला दिन असतो का? पुरुष आजच्या दिवशी मोठेमोठे एसएमएस आणि शुभेच्छा व्यक्त करतात की स्त्रीचा आदर करावा. स्त्री ही सहनशीलता, प्रेम आणि शक्तीचे प्रतिक आहे इत्यादी. परंतु तो आदर केवळ घरातल्या स्त्रियांपुरता असतो असे म्हणणे खोटे ठरणार नाही.

स्त्रियांच्या अधिकाराचा गौरव करण्यासाठी जरी हा दिवस साजरा केला जात असेल तरी स्त्रीचा सन्मान आणि आदर करणे हेसुद्धा या सोहोळ्याचा अविभाज्य भाग आहे. परंतु याला केवळ एका ढोंगाचे स्वरूप येते कारण काही पुरुष आज स्त्री गौरवाचे चार शब्द प्रसारित करीत आहेत; तेच पुरुष उद्या स्त्रियांच्या विवस्त्र चित्रांचा प्रसार आपल्या मित्रांमध्ये करायला सज्ज असतील. म्हणजेच जरी स्त्रियांना त्यांचा अधिकार दिला गेला तरी समाजात तिला एक संभोगाचे चिन्ह म्हणून पाहिले जाते. मोठ्या पदावर बसलेली स्त्री असो किंवा एक कामगार स्त्री. दोघींमध्ये साम्य एकच की ती एक स्त्री आहे आणि तिच्याकडे पाहण्याची दृष्टी केवळ लैंगिक प्रतिक म्हणून असते ही निराशाजनक बाब आहे.

हा एक वादाचा विषय आहे खरा. बऱ्याच जणांना हे विचार पटले नसतील किंवा पटलेही असतील. परंतु आपण किती चुकतो आणि मुख्यतः आपले दोष स्वीकारण्याचा मोठेपणा कुठेही आढळून येत नाही. प्रत्येक नाण्याला जशा दोन बाजू असतात आणि दोन्ही बाजूंना तेवढेच महत्त्व आणि सत्यता असते तसेच आपल्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. आपल्या हातात असते कोणती बाजू बळकट करावी आाणा कोणते दुर्गुण आपल्या आयुष्यातून काढून टाकावे.

मी एक महिला असल्याने मी केवळ महिलांनाच प्राधान्य देणारी नाही. परंतु त्यांचे गुणदोष जाणून या नाण्याची दुसरी बाजूसुद्धा कबूल करते. त्याचबरोबरीने पुरुषांचे दोषसुद्धा नजरेआड न करता जागतिक महिला दिनाच्या सोहळ्याबद्दलच्या फसवणुकीचा निषेध व्यक्त करते.

आपली नाती, आपला परिवार आणि समाजाप्रती आपले कर्तव्य आणि जबाबदारी पूर्णपणे निभावणाऱ्या प्रत्येक नम्र आणि प्रामाणिक स्त्रीला या जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

## पाठारे प्रभु सोशल समाज

समाजाचा १२६वा वर्धापन दिन गुढीपाडवा, सोमवार दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजी सायंकाळी ५ वाजता खार येथील सांस्कृतिक सभागृहात साजरा होणार आहे. अध्यक्ष आहेत- डॉ. सौ. उषा प्रभाकर महेश्वरी. या दिवशी पुरस्कार वितरण सोहळाही होईल. पुरस्काराने गौरविण्यात येणाऱ्या मान्यवरांची नावे आहेत- कुमारी अनिषा भूषण तळपदे, सॉ. श्री मोहन मोतीराम जयकर, श्रीमती प्रतिभा रवींद्र जयकर, सौ. उर्वशी आनंद धराधर, श्री. माधव हरिभाऊ कोठारे, सौ. विजयश्री आनंदकुमार नवलकर, श्री. कुणाल श्रीकृष्ण विजयकर, सौ. कल्पना बिपीन तळपदे, श्री. अरविंद प्रभाकर धुरंधर. शैक्षणिक पुरस्कारांचेही वितरण होणार आहे. या कार्यक्रमास येण्याचे आग्रहाचे आमंत्रण विश्वस्त व कार्यकारी मंडळाने दिले आहे.

*

लेखांक ३

# माणूस म्हणून-

## ब्रँडेड

-डॉ. सुमन नवलकर

युरोप टूरला आस्था जाणार असे कळल्यावर शुभेच्छा देण्यासाठी चंदाने तिला फोन केला. शुभेच्छा दिल्यानंतर सहजच विचारलं की, कसे जाणार? म्हणजे कोणाबरोबर? की आपले आपण?

''आपले आपण नाही बाई. उगीच सगळीकडे डोक्याला ताप घेत कुठे फिरायचं? टूरवाल्यांना एकदा पैसे दिले की मोकळे झालो. आणि कोणाबरोबर म्हणून काय विचारतेस? 'वाटसरू ट्रॅव्हल्स'बरोबर. आतापर्यंत आम्ही जिथे-जिथे म्हणून फिरलो, कायम वाटसरूमधूनच. काय मस्त सहल करवतात ते! पोटचं पाणीही हलत नाही.''

''म्हणजे? नुसतं पाणीच पाजतात की काय?''

''छे गं! इतकं खाऊ-पिऊ घालतात की नुसतं खाल्लं तरी पैसे वसूल. ब्रेकफास्ट असो, लंच की डीनर. शाकाहारी-मांसाहारी पदार्थांची नुसती रेलचेल. चांगली हॉटेलं, चांगल्या बसेस, चांगला गाईड, चांगली सेवा. टूर संपूच नये कधी, असं वाटत राहतं बघ. जावं तर 'वाटसरू'बरोबरच.'' आस्था इतक्या आस्थेने बोलत राहिली की ती त्यांची ब्रँड अँबॅसेडरच आहे की काय असं वाटत राहावं.

चंदाला आठवलं, आपणही कधी कुठे टूरला गेलो की हे 'वाटसरू टॅव्हल्स'वाले आपल्याला त्यांच्या प्रवाश्यांबरोबर कुठे-कुठे भेटत राहतात. कधी हॉटेलमध्ये, कधी विमानात, कधी लाँचमध्ये, तर कधी कुठल्या बागेत. त्यांचा तो शेंदरी टी-शर्ट घातलेला गाईड, त्याच्या हातात तो 'वाटसरू' लिहिलेला छोटासा झेंडा आणि त्याच्या मागून टेचात फिरणारे हे प्रवासी. आपण 'वाटसरू'मधून फिरतोय ही मोठी मानाची बाब असल्याच्या टेचात.

'वाटसरू' म्हणजे सगळंच भव्य-दिव्य. त्यांच्या पान-पान भरून येणाऱ्या वर्तमानपत्रातल्या जाहिराती पाहिल्या कीच समजतं की काम 'बडं' आहे. जुन्या त्यांनीच ठरवलेल्या सहलीच्या खर्चाच्या रकमेवर फुल्ल्या मारून त्यापुढे लिहिलेली नवी रक्कमही इतकी 'बडी' असते, की ती रक्कम मोजून त्यांच्याबरोबर जाणं 'बडं' असणारच. त्यांच्यापुढे इतर टूर-कंपन्या चिल्लर पिल्लर वाटल्या पाहिजेतच.

आस्था ही अशा 'ब्रँडेड' कंपन्या, वस्तू, पदार्थांची ग्राहक. घड्याळ वापरणार ते सिटीझन किंवा रॅडोचं. कपडे वापरणार ते कुठल्यातरी ड्रेस-डिझायनरने बनवलेलेच. शॉपिंगला जाईल ते मोठ्ठ्या मॉलमध्येच. राहतेही एका उच्चभ्रू वसाहतीतच. गाडीतून फिरेल तीही मर्सिडीझ मधूनच. तिची बाळंतपणंसुद्धा त्या चाळीस मजली ब्रँडेड हॉस्पिटलमधेच झाली. मुलं 'बॉम्बे स्कॉटीश'मधे शिकली आणि फोर्टमधल्या महाविद्यालयात.

'हिने चणेवाल्याकडचे पुडीतले चणे, भेळवाल्याकडची पानातली भेळ कधी चाखलीच नसणार. ही फाईव्हस्टार हॉटेलात जाऊन चमच्याने पुरी फोडणार आणि वाटीतलं पाणी-मूग त्यात भरून स्वत:च पाणीपुरी बनवून खाणार.' चंदाच्या मनात आस्थाबद्दल नेहमी गमतीदार विचार येतात. त्या दिवशी चारुहास तिला गमतीने म्हणाला देखील, ''काय ग चंदा, तुझी ही मैत्रीण 'टिशू' कुठल्या ब्रँडचे वापरते गं? विचारलं पाहिजे.''

एकदा तर आस्थाच्या खांद्यावरच्या पर्सला 'गुक्छी'चं लेबल लटकत होतं. चंदाने दाखवलं, तर ''अय्या, राहिलं वाटतं काढायचं,'' म्हणाली पण लेबल काढलं मात्र नाही तिने. त्यादिवशी शाळेतला मैत्रिणींचा अख्खा ग्रूप भेटायचा होता आणि पर्स 'गुक्छी'ची आहे हे सगळ्यांना समजणं महत्त्वाचं होतं. मग ती पर्स सगळ्यांच्या समोर सतरांदा उघडायची आणि आतल्या खाचा-खाचामधे बसवलेली सतराशे पन्नास क्रेडिट, डेबिट, डॉलर, सिल्व्हर, गोल्ड असली कसली-कसली कार्डं सगळ्यांनी पाहावी अशी तसदी घ्यायची.

''खाण्या-पिण्याच्या बाबतीत ठीकच आहे चारू, अमक्या कंपनीचं मिनरल पाणी, तमक्या कंपनीचे खाद्यपदार्थ आहेत म्हटलं की पोटावर, तब्येतीवर अत्याचार होणार नाहीत अशी खात्री असते ना? अमक्या कंपनीचा पंखा किंवा ए.सी., तमक्या कंपनीचा फ्रीज किंवा वॉशिंग मशीन आपणही घेतो ना पाहून. सहसा न बिघडावं आणि बिघडलंच तर चांगली सेवा मिळावी अशाच अपेक्षेने ना?''

''होय चंदा. पण पाहिलंस ना त्या महागड्या प्रायव्हेट रुग्णालयात शस्त्रक्रिया करूनही मावशीच्या पायात घातलेली प्लेट तुटली आणि खालच्या आळीतल्या शांताबाई सरकारी रुग्णालयात पायावर शस्त्रक्रिया करून आल्या, सहा महिन्यात चांगल्या हिंडू-फिरू लागल्या आणि चार घरची कामंही करायला लागल्या.''

''नशिबाचा भाग असतोच ना चारू? पण परवडत असेल तर महागड्या हॉस्पिटलातच शस्त्रक्रिया करेल ना कोणीही?''

''तू असंच बोलणार चंदा. वाचनालयात गेलीस की त्याच चार लेखकांची पुस्तकं उचलणारी तू. दुसरे लेखकही चांगलं लिहितात. पण वाचून पाहायची तयारीच नाही तुझी.''

''आणि भलत्याच लेखकाचं आणलेलं पुस्तक वाचनीय नसलं तर पुन्हा वाचनालयात जायला वेळ मिळेपर्यंत तेच रद्दड पुस्तक पर्समधे वागवत फिरायचं ना? मला नाही परवडत ते.'' चंदाच्या या वाक्यावर चारू हसला आणि म्हणाला, ''तू त्या चार लेखकांची ब्रँड अॅम्बॅसेडर आहेस. त्यांच्याकडून हप्ता वसूल करायला हरकत नाही तुला. स्वत: तर वाचतेसच आणि आजूबाजूंच्यानाही सांगतेस, 'त्या ह्यां'चं ते 'हे' पुस्तक वाचून पाहाच. काय मस्त लिहिलंय म्हणून सांगू.''

चारूच्या वाक्यावर चंदा अंतर्मुख की कशी ती होऊन विचार करू लागली. खरंच तिने वाचनालयातून त्या दिवशी एका नवोदित लेखकाचं पुस्तक आणून वाचलं. पुस्तक नेमकं चांगलं निघालं. एका बंधनातून चंदा चक्क मोकळी व्हायला लागली.

मग वाचनालयातून येताना तिने चक्क एका नव्या सुगंधाच्याच उदबत्त्यांचा पुडा घेतला आणि मनाशी म्हटलं, ''देवांनो, आज तुम्हालाही नव्या सुगंधाचा धूर.''

आज ती आणि मुलं चारू यायच्या आधीच जेवून मोकळी झाली. चारू परस्पर ऑफिसातून मिरचंदानीच्या मुलीच्या लग्नाला जाणार होता.

साडेनऊला चारू आलाच. मग सेवानिवृत्त होऊन गेलेल्या एकेका अधिकाऱ्यांची नावं घेऊन सांगायला लागला. ''अग, तो किरकिरे आला होता. अगदी आहे तसा आहे. पण गोखले, त्याला पायांना खूप त्रास आहे. असा चालत होता माहितीय्?'' म्हणत चारूने चक्क हळूहळू, एक पाऊल, एक पाऊल असं चालून दाखवलं.

चंदा म्हणाली, ''त्याला आमच्या आईच्या पायावरच्या गोळ्यांचे नाव सांगायचं ना! त्या 'आर्थो' रे. चांगल्या आहेत त्या गोळ्या.''

''अगं, नाव आठवता आठवेना. पण लग्नात बाकी सगळे भेटले. गप्पा रंगल्या. मग गोखले म्हणाला, 'नंतर करतो फोन त्या गोळ्यांच्या नावासाठी'.''

तेवढ्यात चक्क चंदाच्या मोबाईलवरच गोखलेचा फोन आला. चंदा म्हणाली, ''चारू सांगत होताच आत्ताच. तुम्हाला दोन्ही ढोपरांना त्रास होतोय म्हणाला. चालूनपण दाखवलं तुमच्यासारखं.''

''होय हो वहिनी. मी आणि बायको, दोघांनाही त्रास होतोय. तिला तर ऱ्हूम्याटिझम, आर्थरायटीस सगळंच आहे. घरात दोघंही पेंग्विनसारखे फिरत असतो. सांगा बुवा त्या गोळ्यांचं नाव.''

''आर्थो- आर्थो-आर्थो.'' फोनवर सांगायचं म्हटलं की ऐकणाऱ्याला वेगळंही ऐकू येऊ शकतं म्हणून चंदाने स्पेलिंगही सांगितलं.

''स्टिरॉईड नाहीये ना त्या गोळ्यात? नाहीतर दुखायचे थांबतील पाय आणि नवाच त्रास सुरू होईल.'' गोखलेने शंका व्यक्त केली.

''नसावं. अहो चांगल्या 'शारंगपाणी' कंपनीच्या गोळ्या आहेत.''

(पान ५ कॉलम ४ वर)

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



# मी हे वाचले. तुम्ही?

-सरोज कोठारे

स्वीडन देशामधल्या स्टॉकहोम या शहरातील राजमार्गावरून सतरा-अठरा वर्षांची मुलगी झपझप पावलं टाकत चालत होती. तिच्या आयुष्यातील ही निर्णायक सकाळ होती. 'आजचा हा प्रयत्न अपयशी ठरला तर अभिनेत्री होण्याचं आपल्या डोक्यातलं वेड आपण विसरून जाऊ. चरितार्थासाठी कुठली तरी नोकरी धरू' असं वचन तिनं आपल्या काकांना दिलेलं होतं. काका जुन्या वळणाचे होते. नाटक-सिनेमात काम करणं म्हणजे वेश्याव्यवसाय करण्याइतकंच लाजिरवाणं असतं असं त्यांचं ठाम मत होतं. तिचे आई-वडील हयात नव्हते. तिची जबाबदारी आता काकांच्यावरच होती. तिनं शिकावं, नोकरी धरावी, लग्न करावं आणि चांगल्या घरातल्या मुलीप्रमाणे आयुष्य जगावं; पण अभिनेत्री होण्याच्या कल्पनेनं तिला पुरतं ग्रासलेलं होतं.

म्हणूनच त्यांनी तिला आजची ही संधी दिलेली होती. आणि ते मिळवायचं असेल तर राष्ट्रीय नाट्य शिक्षण शाळेत प्रवेश घेतलाच पाहिजे इतकंच तिच्या डोक्यात होतं.

ती नाट्यगृहापाशी येऊन पोहोचली. ती आता नाट्यगृहाच्या दाराबाहेर उभी होती. प्रवेशद्वार ओलांडलं आणि ती आत शिरली.

''मिस इन्ग्रिड बर्गमन?''

''हो मीच...''

''तुझा नंबर सोळावा आहे. बराच वेळ लागेल. तुझं नाव पुकारल्यानंतर तू आत जायचं.''

तिनं नाट्यप्रवेशाची हस्तलिखितं अधिकाऱ्याहवाली केलेली होती. पण पूर्ण विचार करून केली होती. परीक्षेसाठी बहुतेक मुली मोठमोठ्या नाटकातील प्रवेश निवडतील. बिचारे परीक्षक नक्कीच हैराण होऊन गेलेले असणार. त्यांना थोडं हसवलं तर... म्हणून तिनं विनोदी प्रवेशाची निवड केली होती. खेड्याची पार्श्वभूमी. एक गावरान मुलगी. पण चटकचांदणी आणि एक खेडवळ तरुण तिची छेड काढताच ती ताडकन् उडी मारून येते. कमरेवर हात ठेवून उभी राहते. खदाखदा हसू लागते...

ठरल्याप्रमाणे तिचा नंबर पुकारला. तिने आत्मविश्वासाने विंगेतून रंगमंचावर उडी घेतली. कमरेवर हात ठेवून ती उभी ठाकली आणि खदखदून हसली आणि संवाद सुरू करण्याआधी तिनं परीक्षकांकडे पाहिले. ती जागच्याजागी थिजून गेली. परीक्षक तिच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून आपापसात बोलण्यात गर्क दिसले. ''बस, बस... पुरे झालं. पुढचा नंबर...'' जड पावलं ओढत ती घरी येऊन पोहोचली आणि थोड्या वेळातच एक फोन आला. 'तुझी निवड झाली आहे'. तिला आश्चर्य वाटलं. इन्ग्रिडच्या यशाचं काकांनी खूप कौतुक केलं. पुढं याच पुतणीचं सर्वश्रेष्ठ अभिनेत्री म्हणून जगभर झालेलं कौतुक पाहण्यास मात्र ते हयात राहिले नाहीत.

अभिनयाच्या शाळेत एक भलंमोठं टेबल होतं. त्या शाळेत शिकून गेलेल्या विद्यार्थिनींच्या स्वाक्षऱ्या त्यावर कोरून ठेवलेल्या होत्या. त्यातली एक स्वाक्षरी होती त्यावेळची सर्वश्रेष्ठ चित्रतारका ग्रेटागार्बोची आणि आपण ह्याच शाळेत शिकत आहोत, अभिनयक्षेत्राचं आपलं अतूट नातं आहे, अशी भावना इन्ग्रिडच्या मनात होती. शाळेची पहिली सहामाही संपली आणि सुट्टी सुरू झाली. काही काम मिळतं का पाहावं म्हणून ती फिल्मस्टुडिओत गेली. तिथे स्वीडीश भाषेतील चित्रपटांचे निर्माते आले होते. त्यांनी तिला पाहिलं. दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता स्क्रीन-टेस्टसाठी स्टुडिओत बोलावण्यात आले आहे असे पत्र दिले. दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळी ती स्टुडिओत जाण्यास निघाली. त्या सकाळी तिनं देवाची प्रार्थना केली नाही. ती ग्रेव्हयार्डमध्ये गेली. आपल्या पप्पांच्या कबरीपाशी जाऊन तिनं गुडघे टेकले आणि म्हणाली, ''मला आधार द्या. आत्मविश्वास द्या.''

आणि तिची निवड झाली. इन्ग्रिडने हे तंत्र हळुहळू आत्मसात करून घेतलं. इन्ग्रिड पहिल्या दिवशी मेकअप करून सेटवर जाऊ लागली. तिच्या वाटेवर फुलांच्या कुंड्या ओळीनं मांडून ठेवलेल्या होत्या. तिच्यासाठी एक संदेश लिहून ठेवलेला होता- 'जिथं जिथं तुझं पाऊल पडेल, तिथं माती फुलं फुलवील. इन्ग्रिड तुझं स्वागत असो!'

अमेरिकेत आल्यावर ती रेल्वेमार्गाने लॉस एंजेलिसमध्ये त्यांच्या प्रतिनिधीबरोबर डेव्हिडच्या घरी गेली. तो म्हणाला, ''पायातले बूट काढ आधी.''

''माझ्या पायात उंच टाचांचे बूट नाहीत. माझी उंचीच तेवढी आहे. तुम्ही मला बसायला कधी सांगणार आहात?''

''बैस. कसलं तुझं ते नाव, छे: छे:... इथं अमेरिकेत असलं नाव मुळीच चालणार नाही.''

''का?'' आश्चर्याने थक्क होत इन्ग्रिडने विचारलं.

डेव्हिड पुन्हा खेकसून म्हणाला, ''कसलं तुझं ते नाव? आम्हाला ते धड उच्चारताही येत नाही. हे जर्मन नाव वाटतं. आम्ही अमेरिकेत एक जर्मन नटी आणली असा समज पसरला तर निकालच लागेल. तुझं नाव बदललंच पाहिजे.''

इन्ग्रिड थंड आणि न रागावता म्हणाली, '' मी माझं नाव बदलणार नाही. माझ्या जन्मापासून माझं हेच नाव आहे आणि हेच कायम राहणार. अगदी अमेरिकेतसुद्धा. इथल्या लोकांना माझं नाव उच्चारता येत नसेल तर त्यांनी शिकलं पाहिजे. नटी म्हणून त्यांनी मला स्वीकारलं नाही तर मला माझ्या मायदेशी परत जावं लागणार हे उघड आहे. मी अपयश पचवू शकते; पण स्वत:चं नाव गमावल्याचा अपमान मी कधीही पचवू शकणार नाही.''

डेव्हिड तिच्याकडे पाहातच राहिला. असं बोलण्याचं धाडस मोठमोठ्या नटांनी आणि नट्यांनीही दाखवलेलं नव्हतं. तो तिच्याकडे पाहातच राहिला. त्याचा क्रोध विरघळला आणि म्हणाला, '' केवढी साधी कल्पना. पण आजपर्यंत हॉलिवूडमध्ये कुणाच्याही डोक्यात आली नाही. निसर्गानं तुला जशी घडवली तशीच आम्ही तुला ठेवणार आहोत.''

'द फर्स्ट नॅचरल ॲक्ट्रेस'.- आणि त्याच रात्री दिग्दर्शक डेव्हिडने एक जंगी पार्टी दिली. इन्ग्रिडचा हॉलिवूडच्या बड्या मंडळींशी परिचय देणं हाच या पार्टीचा उद्देश होता. एक एक मोठे मोठे कलाकार पार्टीला येऊ लागले. क्लार्क गेबल, कॅरी ग्रॅंट, नॉर्मा शिअरर, क्लॉडेट कोलबर्ट, रोनाल्ड कोल्मन आणि अनेक नामवंत. इन्ग्रीड फार खुषीत होती.

गर्दीत कुजबूज चालू होती... दिग्दर्शक डेव्हिडनं स्वीडनहून एक गाय आणलीय. स्वीडीश गाईत आणि हिच्यात काय फरक आहे? कुणी सांगू शकेल?... आणि ही नटी होणार... अभिनय म्हणजे काय हे तरी हिला माहिती आहे काय?... पण इन्ग्रिडनं मिस्किल हसून मनात म्हटलं, पाहूया काय होतंय... गाय की इन्ग्रिड?... आणि दुसऱ्या दिवशी इन्ग्रिडची मेकअप न करता स्क्रीनटेस्ट घेण्यात आली. आणि या चाचणीची फिल्म आजही हॉलीवूडच्या संग्रहालयात जपून ठेवलेली आहे. त्यानंतर डेव्हिडने रूथ रॉबर्टस् हिच्याबरोबर ओळख करून दिली. ''ही तुला आजपासून इंग्रजी बोलायला शिकवील.''

तिनं आश्चर्यानं रूथला विचारलं, ''तुला स्वीडिश भाषा येते?''

रूथ म्हणाली, ''ही माझी मातृभाषा आहे. पण तुला मी आता इंग्रजी शिकवणार आहे. तू भाषेवर प्रभुत्व मिळवलंस की आपण हवं तितकं स्वीडिशमध्ये बोलू.''

इन्ग्रिडनं अमेरिकेत आल्यावर चित्रपट आणि रंगभूमी अशा दोन्ही माध्यमातून आपला अभिनयाचा आविष्कार चालू ठेवला. 'ॲनाख्रिस्ती' या नाटकात आणि दुसरीकडे 'डॉ. जेकिल अँड मि. हाइड' या चित्रपटात तिची कामं चालू होती. मग हंफे बोगार्ट बरोबर 'फॉर हूम दि बेल' झालं. त्यात तिचा बॉयकट अमेरिकेत इतका लोकप्रिय झाला की तरुण मुली याच पद्धतीनं केस कापू लागल्या. त्यानंतर 'गॅस बहर' याच भूमिकेसाठी सर्वश्रेष्ठ अभिनेत्री म्हणून ॲकॅडमी ॲवार्ड मिळालं. यालाच 'ऑस्कर ॲवार्ड' असंही म्हणतात.

इन्ग्रिड बर्गमनला मिळालेला पहिला ॲकॅडमी ॲवार्ड. यानंतर केलं- 'टी अँड सिंपथी' जॉन ॲटस्टेक आणि त्याचवेळी 'ॲनास्टासिया', 'दिव्हिलियट' आणि 'कॅक्टस फ्लॉवर'. आपल्या 'टी अँड सिंपथी' या नाटकाचा प्रयोग संपवून ती आपल्या राफेल नावाच्या हॉटेलात आंघोळ करीत असताना तिचा लहान मुलगा हातात रेडिओ घेऊन धावत आला.

''मम्मा मम्मा, ऐक तुझ्याबद्दल रेडिओवर काहीतरी सांगताहेत.''

हॉलिवूडमध्ये ऑस्कर ॲवार्ड प्रदान करण्याचा समारंभ चालू होता. कॅरी ग्रॅंट तिलाच उद्देशून बोलत होता.

''इन्ग्रिड कुठं आहेस तू? तू असशील तिथून माझे शब्द ऐकते आहेस ना? आम्ही तुझं अभिनंदन करतोय! ॲमास्ताशिया या भूमिकेसाठी तुला सर्वोत्कृष्ट ॲकॅडमी ॲवार्ड देण्यात आलं आहे.''

तिचं हे दुसरं ऑस्कर ॲवार्ड. 'कॅक्टस फ्लॉवर' हे मूळात यशस्वी नाटक. याच नाटकावर चित्रपट निघाला. पण नाटकाच्या फॉरेन नटींना वगळून ही भूमिका इन्ग्रिडला देण्यात आली. परत तिला तिसरं ॲकॅडमी ॲवार्ड मिळालं होतं. इन्ग्रिडची यशोगाथा आता संपत आलेली होती. तिला स्तनाचा कर्करोग झाला होता. एक ऑपरेशन झालं तरी ती नाटक-सिनेमात कामं करीत राहिली होती. तिला दुसऱ्या स्तनाचा कर्करोग झाला. अशाच एका प्रयोगानंतर विषण्ण मन:स्थितीत मेकअप उतरल्यानंतर रिकाम्या थिएटरमध्ये एकटीच जाऊन बसली. शून्य नजरेने रंगमंचाकडे पाहत राहिली. तिचा मृत्यू तिला दिसू लागला होता. ती मनात म्हणत होती, 'मी अभिनय करत राहणार. तोच माझा श्वास आहे. ह्या आनंदाची गोडी अवीट आहे. आम्ही कलावंत याच विश्वासानं आमचं प्रतिबिंब घडवतो. तो आनंद मला हवा आहे. आज मी मरणोन्मुख आहे. पण मरणोन्मुख म्हातारीची एखाद्या चित्रपटात किंवा नाटकात भूमिका असेल तर दाराशी मी सदैव वाट पाहत उभी असेन.' कर्करोगाने तिचा बळी घेतला. तिनं त्या रिकाम्या थिएटरमध्ये तिसऱ्या रांगेच्या खुर्चीमध्ये मान टाकली.

इन्ग्रिड बर्गमनसारख्या विश्वविख्यात कलावतीचा निरोप घेऊया.

लेखांक-३

# केल्याने देशाटन

— हेमलता केशव कोठारे

हं. गेल्या अंकात मी म्हटलं होतं की, 'मी पाहिलेल्या ऑस्ट्रेलिया'विषयी लिहीन. तशी देशाविषयी माहिती सर्वांनाच असते. पण 'माझेपण' वेगळेच ना? तर आता मी पाहिलेल्या ऑस्ट्रेलियाकडे वळते बरं का. हा देश दक्षिण गोलार्धात आहे. त्यामुळे त्याचा 'डाऊन अंडर' म्हणूनही उल्लेख केला जातो. हा देश क्षेत्रफळाच्या दृष्टीने विशाल आहे. त्यातही बराच प्रदेश हा वाळवंटी. आणि क्षेत्रफळाच्या तुलनेत देशाची लोकसंख्या अगदीच कमी. असं म्हटलं जातं की, दरवर्षी आपला भारत देश लोकसंख्येच्या तुलनेत एक नवीन ऑस्ट्रेलिया निर्माण करतो. गंमत सोडून द्या. पण ही काही भारतासाठी भूषणावह गोष्ट खचितच नाही. लोकसंख्येच्या तुलनेत आपला भारतदेश चीनलाही काही वर्षात मागे टाकेल असं वर्तविण्यात आलं आहे. असो. हा काही माझ्या लिखाणाचा विषय नव्हे. ऑस्ट्रेलियावरही बराच काळ ब्रिटिशांचे साम्राज्य असल्याने ब्रिटिशांची छाप जागोजागी दिसून येते. त्यामुळेच असेल कदाचित; भारत आणि ऑस्ट्रेलियातील कायद्यात बरेच साधर्म्य दिसून येते. हवामानातही बरेच साम्य आहे. येथे हिमवर्षाव होत नाही. परंतु बाराही महिने पाऊस पडतो. येथील हवामान अतिशय लहरी. इंग्लंड जशी क्रिकेटची पंढरी, तसेच ऑस्ट्रेलियाही क्रिकेटकरिता जगप्रसिद्ध आहे. ऑस्ट्रेलियन क्रिकेट टीम ही जगातील अग्रेसर टीम समजली जाते. जगप्रसिद्ध क्रिकेटीयर 'ब्रॅडमन' हा सिडनीचाच.

कॅनबेरा ही ऑस्ट्रेलियाची राजकीय राजधानी. पण सिडनी ही आर्थिक राजधानी होय. सिडनी ही साऊथ वेल्स प्रांताची (एनएसडब्ल्यू) राजधानी आहे. सन १७८८ मध्ये हे सिडनी शहर वसले. येथे ब्रिटिशांप्रमाणेच थोड्या प्रमाणात फ्रेंचांच्या वसाहती होत्या. या देशाची राष्ट्रभाषा व प्रमुख भाषा इंग्रजी आहे. पण काही फ्रेंच वसाहती असल्याने बऱ्याच लोकांना फ्रेंच भाषाही उत्तम येते. बाजारातील सर्व वस्तूंच्या पाकिटावर वरच्या ओळीत इंग्रजी आणि खालच्या ओळीत फ्रेंचमध्ये तपशील दिलेला असतो. कॅनडातही हीच पद्धत प्रचलित आहे. ऑस्ट्रेलियात युरेनियम, सोने, हिरे, लोह, कोळसा व इतर अनेक खनिजांचे साठे आहेत. जगभरातील इतर देशातून आलेल्या काही लोकांना ह्या खनिजांचे साठे (खाणी) मिळाले. ह्याची कुणकुण जेव्हा जगातील इतर देशवासियांना लागली तेव्हा जगातून लोकांचे लोंढेच्या लोंढे ऑस्ट्रेलियाकडे येऊ लागले. त्यात मुख्यत्वे ब्रिटिश लोक होते. सिडनीला विशाल समुद्र किनारा लाभलेला असल्याने सन १७८८ला औद्योगिक हेतूने 'डार्लिंग हार्बर'ची निर्मिती झाली. मिळालेल्या खनिजांना जागतिक व्यापारीभूमीवर नेण्याकरिता ह्या बंदराचा उपयोग करण्यात आला. हा काळ ब्रिटिश अधिपत्याचा होता. ब्रिटिशांनी जगाच्या पाठीवर राणी व्हिक्टोरियाचे साम्राज्य निर्माण केले होते. त्यावेळी विमानप्रवास नव्हता. संपूर्ण प्रवास बोटीने करावा लागे. महिनोन्‌महिने हा प्रवास चाले. प्रवासात अनेक अडथळे येत. पण यावर मात करणार नाही तो ब्रिटिश कसला? त्यांनी उभ्या जगात वसाहती स्थापन केल्या. हलके हलके त्यातून आपले साम्राज्य निर्माण केले. वाचकहो, गैरसमज करून घेऊ नका. मला काही ब्रिटिशांची बाजू घ्यायची नाही. परंतु ब्रिटिशांचे धैर्य, मनोनिग्रह, काम करण्याची अफाट क्षमता, शिस्त, वाटेल त्या परिस्थितीशी झगडण्याची तयारी हे त्यांचे गुण तर मान्यच करावे लागतील. म्हणून तर अमेरिकेच्या आधी ब्रिटिशांनी जगावर सत्ता प्रस्थापित केली. कोठे ब्रिटन, कोठे भारत, कॅनडा, आफ्रिका किंवा इतर देश! सर्वांवर त्यांनी अधिराज्य गाजवलं. म्हणूनच ना, त्यांना 'ग्रेट ब्रिटन' ही बिरुदावली प्राप्त झाली असावी, असे वाटते. अर्थात दुसऱ्या देशावर अतिक्रमण, अत्याचार करून त्यांनी साम्राज्ये निर्माण केली ही बाब तर मानवतेला धरून नाही हेही तितकेच खरे. असो.

तर 'डार्लिंग हार्बर' मध्ये औद्योगिक कारणाने १८५७ साली 'पीरमाँट' ब्रिज बांधण्यात आला. पर्सिएलियन नावाच्या इंजिनीयरच्या डिझाइनची ही करामत. त्याच्याच देखरेखीखाली हा ब्रिज बांधण्यात आला. आपल्या कारकिर्दीत पर्सिएलियनने एकूण पाचशे त्र्याऐंशी ब्रिजेसचे काम पूर्ण केले. हा ब्रिज जगातील अत्यंत जुना, विजेवर चालणारा व सरकत्या पद्धतीने (स्विंग स्पान ब्रिज) मधोमध ठराविक कोनामध्ये आणि ठराविक वेळेला उघडणारा ब्रिज आहे. तो जेव्हा उघडतो तेव्हा ब्रिजवरील वाहतूक थांबते. परवा मध्य रेल्वेच्या गाडीचे अक्षरशः दोन सुटे भाग झाले ना; तसा तो ब्रिज अक्षरशः मध्ये दुभंगतो. ह्यावेळी तिथून हार्बरमधील मोठी मालवाहू जहाजे जातात. पुन्हा ठराविक वेळेनंतर सरकत्या पद्धतीने ब्रिज पूर्ववत 'जैसे थे' होतो. वाहतूक पुन्हा सुरळीत चालू. ही सर्व प्रक्रिया मला बघावयास मिळाली. ही प्रक्रिया बघताना मला तर ते जगातील एक आश्चर्यच वाटले. इंजिनीयर्सची बुद्धीमत्ता, कार्यक्षमता, अचूक तंत्रज्ञान यांना सलामच करावासा वाटला. हा संपूर्ण ब्रिज लोखंडी आहे. एकशेसाठ वर्षे होऊनही तो अद्याप सुस्थितीत आहे; याचे कौतुक वाटले.

(क्रमशः)

## पाठारे प्रभु महिला समाज

✳ २-२-२०१४ रोजी महिला समाजाची एक दिवसीय सहल मंथन रिसॉर्ट, विरार येथे नेण्यात आली. येताना विरारच्या कनकाई देवीच्या दर्शनाचा लाभ घेऊन तेथील गोशाला भगिनींनी पाहिली.

✳ दिनांक १६ फेब्रुवारी २०१४ रोजी खार येथील सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात महिला समाजाचा नव्याण्णवावा वार्षिक बक्षिस समारंभ मोठ्या थाटात साजरा झाला. सुरुवातीला समाजाध्यक्षा सौ. वृंदा शाम जयकर यांनी प्रास्ताविक करताना समाजाच्या येणाऱ्या शताब्दी वर्षाचे सुतोवाच केले. मुंबईतील समस्त महिला मंडळात पहिल्यांदा शंभरी साजरी करण्याचा मान पाठारे प्रभु महिला समाजाचा आहे; याचा त्यांनी सार्थ अभिमानाने उल्लेख केला. शताब्दी वर्ष साजरे करण्यासाठी ज्ञातीतील काही मान्यवरांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. या मान्यवरांचाही त्यांनी उल्लेख केला. मोठ्या जोमाने होऊ द्यात शताब्दी वर्ष साजरे! बक्षिस समारंभाच्या अध्यक्ष होत्या, सौ. मुग्धा धनंजय कर्णिक. या मुंबई विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण विभागाच्या संचालिका आहेत. त्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. मानकरी होत्या- श्रीमती सरोज नवलकर- शारंगपाणी (समाजसेवा रौप्यपदक), श्रीमती उज्ज्वला गोविंदराव आगासकर (छायाचित्रणासाठी रौप्यपदक), सौ. ज्योती श्रीकृष्ण तळपदे (गृहकृत्यदक्ष रौप्यपदक), डॉ. सौ. अनिता सुनील कोठारे (सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी रौप्यपदक) सौ. त्वरिता संजय दळवी (रौप्यपदक) आणि सौ. पूनम देसाई- कुर्डेकर (स्मृतिचिन्ह). यावेळी कुमारी अशना अभिजित तळपदे,

(पान ६ कॉलम ४ वर)

(पान ३ कॉलम ४ वरून)

''मोठे नाव असलं तरी गोंधळ नसतोच अशी खात्री कुणी द्यावी?'' गोखले तरीही शंकाकूल होताच.

''गोळ्या घेताना ठणकावून विचारा दुकानदाराला. आणि 'स्टिरॉईड आहे' म्हणाला तर मलाही सांगा. आईलाही सांगेन मी.'' चंदालाही शंका आली मग. रात्री झोपेतही चंदाला स्वप्नात पेंग्विनसारखे चालणारे गोखले पती-पत्नी दिसले आणि दचकून जागी झाली ती.

दुसऱ्या दिवशीही दचकण्याची बातमी मिळायची होती. दहा वाजता ऑफिसच्या वाटेवर असतानाच मंजिरीचा फोन आला. ''काल आस्थाची बायपास झाली, चंदा. पेसमेकर लावला गं.''

''काय म्हणतेस? एवढ्या लहान वयात? इतक्या अचानक?'' मग ऑफिसातून येतायेता मंजिरीबरोबरच चंदा त्या पंचतारांकित हॉस्पिटलात आस्थाला पाहायला गेली. आस्था मलूल झाली होती. पण मैत्रिणींना पाहून उजळला तिचा चेहरा. मग या दोघी आपापली ऐकिवातली माहिती पुरवायला लागल्या.

''इलेक्ट्रिक बोर्डाच्या जवळ, चालू मिक्सरजवळ वगैरे जाऊ नकोस हं का आस्था.'' मंजिरी म्हणाली.

''हो, आणि डाव्या कानाने मोबाईलवर बोलायचं नाही. शर्ट घातलास तर डाव्या वरच्या खिशातही ठेवायचा नाही मोबाईल.'' चंदानेही म्हटलं.

''अगं, या सगळ्या गोष्टी ठाऊक आहेत मला. पण मला काही हे सगळे नियम पाळावे लागणार नाहीत असं म्हणाले डॉक्टर. जगातला सर्वात महागडा 'पेसमेकर' लावलाय मला. काय बाई नाव त्याचं?'' आस्था आठवायला लागली. पण सर्वात महागड्या अॅनेस्थेशियाचा प्रभाव असणार अजून मेंदूवर. नाव आठवेनाच.

''ते एक बरंच झालं.'' रुग्णालयातून बाहेर पडल्यावर चंदा मंजिरीला म्हणाली.

''तर काय! आम्हाला नकोच ती बायपास; आणि नकोच तो महागडा पेसमेकर. पण काय गं, एवढं सगळं ब्रँडेड वापरून वेळच कशी आली हिच्यावर अशी?'' मंजिरीला शंका आलीच.

''मग काय? आपल्याला थोडाच परवडणार आहे तो जगातला सर्वात महागडा पेसमेकर?''

तेवढ्यात 'बेस्ट'ची साधी लाल बस आली. दोघी घाईघाईत बसमध्ये चढून घराकडे निघाल्या. प्रदूषणाची पर्वा न करता, साध्या लाल बसमधून, धूर, धूळ आणि पेट्रोल-डिझेलचे वास खात खात निश्चितपणे आपापल्या घरकुलाकडे.

✳

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणाची डायरी

### कुर्यात बटोर्मंगलम्

२-२-१४ चि. रोमिर राहुल नवलकर

### नांदा सौख्यभरे

८-२-१४ श्री. विपुल प्रमोद भोलानाथ जयकर कु. श्रुतिका भुरके (आं. ज्ञातीय)
२२-२-१४ कु. प्रियांका मिलिंद मुकुंद कोठारे श्री. अनिकेत अरुण खानविलकर (आं. ज्ञातीय)

### विवाह माणिक महोत्सव

२२-१२-१३ सौ. प्रमदा आणि श्री. प्रकाश वसंत जयकर

### विवाह सुवर्ण महोत्सव

२५-१-१४ श्री. जयबाळ मोतीराम विजयकर, कु. आशा आनंदराव जयकर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ३१-१-१४ | श्री. शैलकुमार मोरेश्वर दळवी | वय ७२, | पेण |
| १०-२-१४ | श्री. रमेश रामराव कोठारे, | वय८०, | दादर |
| १४-२-१४ | श्री. शुभ्रकांत खंडेराव कोठारे | वय ८२, | दादर |
| १५-२-१४ | श्री. माधव जयसिंग नवलकर | वय ५३, | कांदिवली |
| २२-२-१४ | श्री. सागर इंद्रसेन अजिंक्य | वय ४७ | तळेगाव |
| २८-२-१४ | श्री. विजय बभ्रुवाहन धुरंधर | वय ८२ | खार |

## प्रभुतरुणास देणगी

✳ श्री. उमेश गजानन कोठारे यांजकडून त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. २००१/-

✳ सौ. रश्मी आणि श्री. प्रमोद भोलानाथ जयकर यांजकडून श्री. विपुल आणि श्रुतिकाच्या विवाहाप्रीत्यर्थ रु. ५०१/-

✳ सौ. जना व रवींद्र नवलकरकडून त्यांचा पणतू चि. रोमिर राहुल नवलकर याच्या व्रतबंधनानिमित्त रु. ५०१/-

✳ श्रीमती अमला सुबोध कोठारे यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✳ सौ. प्रमदा आणि श्री. प्रकाश वसंत जयकर यांजकडून त्यांच्या विवाहास चाळीस वर्षे झाल्याबद्दल रु. ५००/-

✳ सौ. इना भोलानाथ तळपदे यांजकडून रु. २५१/-

✳ श्री. उल्हास वामनराव कोठारे स्मरणार्थ श्रीमती स्निग्धा कोठारे यांजकडून रु. २५०/-

✳ सौ. स्वाती आणि श्री. संदीप शरद देसाईंकडून त्यांची कन्या दीप्ती हिने टेक्स्टाईलच्या इंटर नॅशनल कॉन्फरन्समध्ये पहिले पारितोषिक पटकावल्याबद्दलरु. २००/-

✳

## अभिनंदन

✳ सौ. कल्पना सुभाष कोठारे यांचे 'बायबलमधील गोष्टी' हे पुस्तक अजब पुस्तकालयतर्फे प्रकाशित झाले. 'माझी सहेली' या अंकात त्यांची कथा प्रसिद्ध झाली. अभिनंदन.

✳ 'प्रभुतरुणा'चे मुद्रक श्री. प्रमोद भोगटे यांच्या 'नवसंदेश' साप्ताहिकाचा हीरक महोत्सवी विशेषांक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते थाटामाटात प्रकाशित झाला. अभिनंदन.

✳ श्री. निलेश विठोबा नायक (Head-Training and organization Devlopment, Bayer Zydus Pharma Pvt. Ltd.) यांना Asia Pacific Human Resource Management Congress यांच्याकडून 30 Best Training and Devlopment Professional of India हा सन्मान दिनांक ५ सप्टेंबर २०१३ रोजी बंगलोर येथे प्रदान करण्यात आला.

✳ World Training and Development Congress 2014 यांनी श्री. निलेश विठोबा नायक (Head-Training and organization Devlopment, Bayer Zydus Pharma Pvt. Ltd.) यांना १५ फेब्रुवारी २०१४ रोजी झालेल्या वर्ल्ड एचआरडी काँग्रेसच्या कार्यक्रमात सहभागी होऊन त्यांचे विचार जगातून आलेल्या ५००हून अधिक सुविद्य लोकांपुढे मांडून त्यांना मार्गदर्शन करण्याचा मान दिला. याच कार्यक्रमात त्यांना ग्लोबल ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट लीडरशीप अवॉर्ड प्रदान करण्यात आले. अभिनंदन.

✳ २२-२-२०१४ रोजी 'खानदेश सेने'तर्फे झालेल्या कार्यक्रमात डॉ. सौ. मीना (धराधर) आंबवणे यांना 'मी भिवंडीकर' हा समाजप्रबोधनाचा सन्मान पुरस्कार देण्यात आला. 'मी भिवंडीकर' या सन्मानासाठी नऊ जणांची निवड करण्यात आली; त्यात डॉ. मीना यांचे शैक्षणिक योगदान विचारात घेण्यात आले. अभिनंदन.

✳ श्री. आनंद नरेश आगासकर हे सिटी बँकेच्या ग्लोबल कंझुमर ग्रुपचे असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट झाले. अभिनंदन.

✳ डॉ. सुमन नवलकरांचा दादर ग्रंथसंग्रहालयतर्फे आयोजित कविसंमेलनात संहभाग होता. अभिनंदन.

✳ कुटुंब न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश सौ. बागेश्री परीख यांचा मुंबई मराठी साहित्य संघातर्फे बदलापूर येथे झालेल्या महानगर मराठी साहित्य संमेलनातील परिसंवादात सहभाग होता. अभिनंदन.

**खास पाठारे प्रभूंचा ताशा**
मुंजी, लग्न, वरघोडा आणि वरातीसाठी संपर्क:-

**श्री. मंगू ताशेवाला**

मोबाईल नं.:
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९

पत्ताः
खोली क्र. ७, पहिला मजला,(जयश्री मसाला वर), बिल्डिंग नं. ६७/६९, कामाठीपुरा ७वी गल्ली, एम. आर. रोड, मुंबई-४००००८

✳ श्रीमती मृदुला प्रभुराम जोशी यांच्या 'अभिजन प्रियजन' या ललित लेखसंग्रहाचे ९ मार्च रोजी प्रकाशन झाले. त्याचा वृत्तांत पुढील अंकी. त्यांचे अभिनंदन.

(पान ५ कॉलम ३ वरून)

कु. सानिया नितीन नवलकर, कुमारी अनुष्का आशिष नवलकर, सौ. विंदा प्रदीप कीर्तिकर, श्रीमती मधु वसंतराव धुरंधर, डॉ. सौ. सुमन सुवर्णकुमार नवलकर, सौ. साया सुनील नवलकर, प्रा. सुहासिनी अशोक कीर्तिकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

ईशस्तवन आणि यशस्वी विद्यार्थिनींचा गौरव करणारे गीत श्रीमती नलिनी रामराव तळपदे यांचे होते. साथीला पेटीवर सौ. शुभांगी घैसास होत्या तर तबल्यावर श्री. प्रदीप श्रीकर राणे होते. गायिका होत्या सौ. देवश्री निषाद धुरंधर. नेटके सूत्रसंचालन सौ. नीता सेंजित यांचे होते. आभार सौ. नूतन कीर्तिकर यांनी मानले. कार्यक्रम वेळेत सुरू झाला. समारंभाच्या पाहुण्या अध्यक्षांचे भाषण तर मेजवानीच होती. त्यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थिनींचा गौरव होणे हा सन्मानच होता. राष्ट्रगीतानंतर अध्यक्षीय भाषणाच्या मेजवानीला शोभेल अशी कुल्फी देण्यात आली. महिला समाजाला शताब्दी वर्षानिमित्त शुभेच्छा.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67